प्रेस नोट :

दिनांक : ०८/०९/२०१५

स्वच्छ भारत मिशन- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सोलापूर शहर हागणदारी मुक्त करणेच्या उद्देशाने दि.२१/७/२०१५ पासून दि. १०/९/२०१५ अखेर सोलापूर शहरातील वैयक्तीक शौचालय नसलेल्या सर्व कुटूंबधारकांकडून वैयक्तीक शौचालय मागणीकरीता अर्ज मागविणेत आलेले असून, ही कार्यवाही अंतिम टप्प्यात आलेली आहे.

ज्या लाभार्थ्यांकडून अर्धवट कागदपत्रे दिलेली असतील, अथवा वैयक्तीक शौचालय मागणी अर्ज भरुन दिलेला नसेल त्यांनी शेवटच्या २ (दोन) दिवसात म्हणजेच दिनाक १० सप्टेंबर २०१५ पर्यंत आपल्या प्रभागातील संबंधित आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधून कागदपत्रांच्या पुर्ततेसह शौचालय मागणी अर्ज करावेत. **यापूर्वी घर तेथे शौचालय अथवा इतर कोणत्याही योजनेतून वैयक्तीक शौचालय करीता अनुदान प्राप्त झाले असल्यास अशा लाभार्थ्यांना या योजनेतून लाभ मिळणार नाही.** या मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही.

तरी ज्या लाभार्थ्यांनी अद्याप वैयक्तीक शौचालय मागणी करीता अर्ज व कागदपत्रांची पूर्तता केलेली नसेल त्यांनी त्वरीत आपल्या प्रभागातील संबंधित आरोग्य निरीक्षक यांचेशी संपर्क साधून कागदपत्रांच्या पुर्ततेसह शौचालय मागणी अर्ज करावेत असे आवाहन सहाय्यक आयुक्त (महसूल ) तथा प्रमुख- स्वच्छ भारत मिशन, सोलापूर महानगरपालिका यांनी केलेले आहे.

----------X--------

प्रति,

मा.संपादक,

दै-----------------------------

वरील वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करुन सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

( दत्तात्रय चोगुले )

समन्वयक- स्वच्छ भारत मिशन

मनपा सोलापूर